# उपविभागीय अधिकारी कार्यालय, पाटोदा

ता.पाटोदा जि. बीड

Phone No. 02444-242329 E-Mail. sdopatoda@gmail.com


संदर्भ :- मा. जिल्हाधिकारी बीड यांचे परिपंत्रक क्र.2025/आरबी-डेस्क-1/पोल-1/पोलीस पाटील/ कावी दि. 08/01/2026

**बीड जिल्हयातील, पाटोदा उपविभागातील परिशिष्ट "अ" प्रमाणे रिक्त असलेली पोलीस पाटील पदे भरणेबाबत**

बीड जिल्हयातील पाटोदा उपविभागाचे उपविभागीय दंडाधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील 246 गावातील एकूण 246 पोलीस पाटील पदभरतीसाठी अर्हताधारक उमेदवारांकडुन विहीत नमुन्यात फक्त ऑनलाईन पध्दतीने https://beed.gov.in व https://beedpp.recruitonline.in या संकेतस्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहेत.

**अ) वेळापत्रक**

| अ.क्र. | करावयाची कार्यवाही | दिनांक |
|---|---|---|
| 1 | ऑनलाईन अर्ज भरण्याची सुरुवात | 19/01/2026 वेळ दुपारी 00.00 वा. पासून |
| 2 | ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत | 30/01/2026 वेळ रात्री 23.59 वा. पर्यंत |
| 3 | उमेदवारांचे अर्जाची छाननी व पात्र उमेदवारांना प्रवेशपत्र निर्गमीत करणे (सबंधित उमेदवाराने संकेतस्थळावरुन प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घ्यावेत) | 02/02/2026 ते 06/02/2026 |
| 4 | लेखी परिक्षा दिनांक | 22/02/2026 |
| 5 | प्रथम उत्तर तालिका (First Answer key) प्रसिध्द करणे | 22/02/2026 सायंकाळी |
| 6 | लेखा परीक्षेचा निकाल घोषित करणे | 24/02/2026 |
| 7 | मुलाखतीस पत्र उमेदवारांची यादी प्रसिद्ध करणे | 24/02/2026 |
| 8 | मुलाखतीचा दिनांक | 25/02/2026 ते 28/02/2026 |
| 9 | अंतिम निकाल जाहीर करणे | 02/03/2026 |

**टीप :- वरील कोणत्याही दिनाकामध्ये बदल करण्याचे अधिकार राखून ठेवले आहेत. त्याबाबत झालेल्या बदला बाबत संकेतसंकेस्थळावर माहिती देण्यात येईल.**

**परिक्षा शुल्क खालील प्रमाणे विहित पध्दतीने भरावे लागेल.**

| | |
|---|---|
| खुला प्रवर्ग -रुपये 1000/- | Payment Online पद्धतीने संकेतस्थळावर अर्ज भरतांना त्याच वेळी परिक्षा शुल्क ऑनलाईन अदा करणे बंधनकारक राहील. |
| आरक्षीत/आर्थीक दुर्बल घटक प्रवर्गासाठी रुपये 800/- | |

(वर दर्शविण्यात आलेले प्रक्रिया शुल्क बँक प्रोसेसिंग चार्ज वगळून आहे.)

UPI-Phonepay, Gpay नेटबँकिंग/ डेबिट कार्ड/ क्रेडीट कार्ड द्वारे online पद्धतीने प्रक्रिया शुल्क भरल्यास निवडलेल्या पर्यायानुसार आवशक ते बँकेची सेवाशुल्क भरावे लागेल.

Online पद्धतीने शुल्क भरणा करणाऱ्या उमेदवारांनी त्यांच्या व्यवहारात यशस्वी (Payment Transaction Sucessful ) झाल्यची संपूर्ण खात्री करून घ्यावी. प्रक्रिया शुल्क भरण्याकरिता नेटबँकिग / डेबिटकार्ड / क्रेडीट कार्ड

वापरून होणाऱ्या व्यवहारांची संपूर्ण जबाबदारी उमेदवारांची आहे उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय पाटोदा यास जबाबदार असणार नाही.

सरळसेवा भरती प्रक्रीयेची सविस्तर जाहीरात https://beed.gov.in व https://beedpp.recruitonline.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल. अर्जदाराने संपूर्ण प्रक्रीया काळजीपूर्वक समजून ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावेत. पोलीस पाटील पदाचे परिक्षेचे अर्ज व परिक्षा शुल्क फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्विकारले जातील. इतर कोणत्याही प्रकारे परिक्षा शुल्क स्विकारण्यात येणार नाही. सदर ऑनलाईन अर्ज दिनांक 30/01/2026 वेळ रात्री 23.59 वा. पर्यंत सादर करावा. प्रस्तुत पदाकरीता केवळ उक्त संकेतस्थळावर विहीत ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्ज ग्राहय धरण्यात येतील. सदर संकेतस्थळावर भरती प्रक्रिया दरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती प्रक्रीयेच्या माहितीबाबत अद्यावत व जागृत राहण्याची जबाबदारी अर्जदाराची राहील. भरणा केलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीत परत करण्यात येणार नाही. भरती प्रक्रिया परिक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशतः बदल करणे पदाच्या एकूण व आरक्षण प्रवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रिये संदर्भात वाद तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार संबंधीत उपविभागीथ दंडाधिकारी यांनी राखून ठेवले असून त्यांचा निर्णय अंतिम असेल, याची सर्वांनी नोंद घ्यावी. संबंधीत उपविभागातील पोलीस पाटलांची मंजूर पदे, रिक्त पदे, तसेच 30% महिलांसाठी आरक्षित ठेवलेली पदे विचारात घेवून सद्यस्थितीत जी पदे भरणे आवश्यक आहे, त्याबाबतची उपविभागनिहाय माहिती सोबत जोडलेले परिशिष्ट "अ" मध्ये दर्शविलेली आहे.

**ब) पोलीस पाटील पदासाठी किमान आवश्यक अर्हता :-**

1) अर्जदार हा किमान दहावी (एस. एस. सी) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

2) (अ) वयोमर्यादेकरीता अर्जदाराचे दिनांक 30/01/2026 रोजीचे वय विचारात घेतले जाईल.

(ब) अर्जदाराचे वय दिनांक 30/01/2026 रोजी 25 वर्षा पेक्षा कमी नसावे व 45 वर्षा पेक्षा जास्त नसावे.

(क) पोलीस पाटील पदांकरीता वयोमर्यादा शिथिलक्षम नाही.

3) अर्जदार हा संबंधीत गावचा स्थानिक व कायम रहिवाशी असावा. (तहसिल कार्यालयाकडील वय व अधिवास प्रमाणपत्र आवश्यक)

4) अर्जदाराने अर्जामध्ये स्वतःचा आधार क्रमांक व मोबाईल क्रमांक नमूद करवा.

5) अर्जदार शारीरिकदृष्ट्या सक्षम असावा व अर्जदाराचे चारित्र्य निष्कलंक असणे आवश्यक आहे.

6) महाराष्ट्र राज्य सेवा (लहान कुटुंबातील प्रतिज्ञापत्र) नियम 2005 मधील लहान कुटुंबाची अर्हता धारण करणे आवश्यक आहे. (अर्जदार याची अर्हता दिनांकास दोन पेक्षा जास्त अपत्य नसावेत.)

7) प्रवर्ग निहाय आरक्षित पदाकरीता त्या प्रवर्गाचे सक्षम अधिकारी याने निर्गमित केलेले जातीचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

8) इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, विजा-अ व भज-ब, क, ड, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग या प्रवर्गातील अर्जदार यांना सन 2025-26 या कालावधीकरीता वैध असलेले उन्नत आणि प्रगत व्यक्ती गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे दिनांक 2025-2026 किंवा त्यापुर्वी निर्गमित केलेले (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

9) इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, विजा-अ व भज-ब, क, ड, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग या प्रवर्गातील महिला पदासाठी अर्ज करणाऱ्या अर्जदार यांना सन 2025-26 या कालावधीकरीता वैध असलेले उन्नत आणि प्रगत व्यक्ती गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे दिनांक 2025-2026 किंवा त्यापुर्वी निर्गमित केलेले (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

10) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) करीता आरक्षीत जागेसाठी वर्ष 2025-26 चे तहसिलदार यांनी निर्गमित केलेले महाराष्ट्र राज्याचे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

11) सर्व आवश्यक कागदपत्र व पात्रता निकषांसाठी अर्हता दिनांक ही 30/01/2026 ही राहील.

**क) परिक्षेचे स्वरुप :-**

| अ.क्र. | पदनाम संवर्ग | परिक्षेचे गुण | | |
|---|---|---|---|---|
| | | लेखी परिक्षा | तोंडी परिक्षा (मुलाखत) | एकुण गुण |
| 1 | पोलीस पाटील | 80 | 20 | 100 |

उपविभागीय दंडाधिकारी पाटोदा

**लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरुप साधारणपणे खालील प्रमाणे राहील :-**

1. पोलीस पाटील पदाची लेखी परिक्षा 80 गुणांची असेल.

2. प्रत्येक प्रश्न एक गुणाचा राहील, लेखी परिक्षेची प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरुपाची असेल.

3. लेखी परिक्षा इयत्ता दहावी (एस. एस. सी.) पर्यंतच्या अभ्यासक्रमावर आधारित असेल यात सामान्य ज्ञान, गणित,बुद्धिमत्ता चाचणी, पोलीस पाटलांचे अधिकार व कर्तव्य, स्थानिक परिसराची माहिती, व चालु घडामोडी इत्यादी विषयाचा समावेश असेल.

4. लेखी परीक्षेत एकूण 80 गुणा पैकी किमान 36 गुण (45%) प्राप्त केलेल्या अर्जदारा मधील उच्चतम गुण मिळालेल्या पर्याप्त प्रमाणातील अर्जदाराचे तोंडी परीक्षा घेण्यात येईल.

5. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रनिम्/2010/2009/प्र.क्र.66/10/13-अ दिनांक 16/06/2010 मधील तरतुदीनुसर लेखी परिक्षा घेतेवेळी उत्तरपत्रिकेवर चिन्हांकित करण्यासाठी फक्त काळया शाईचा बॉलपेन वापर करावा लागेल.

6.लेखी परीक्षेत मुलाखतीस पत्र ठरलेल्या उमेदवास पोलीस पाटील भरती/ निवडीसाठी घेण्यात येणाऱ्या 20 गुणाच्या तोंडी (मुलाखत) परीक्षेस उपस्थित राहणे अनिवार्य राहील. तोंडी परीक्षेस अनुपस्थित राहणारा उमेदवार अंतिम निवडीस अपात्र ठरेल.

**ड) निवड कार्यपध्दती, अटी व शर्तीः-**

1. प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवडीसाठी अर्जदारांस शैक्षणिक पात्रता व इतर संबंधीत मुळ प्रमाणपत्र तपासणीसाठी मुदतीत उपलब्ध करून द्यावे लागतील, अन्यथा अंतिम निवडीसाठी त्याचा विचार केला जाणार नाही.

2. लेखी परीक्षा, तोंडी परीक्षा, कागदपत्रे छाननी, इ. करिता तसेच प्रवेशपत्र, भरती कार्यक्रम, विविध सूचना या केवळ संकेस्थळावर उपलब्ध करण्यात येतील, पोस्टाद्वारे पाठविण्यात येणार नाहीत. सबब सदर संकेस्थळाला भरती प्रक्रीये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती / कार्यक्रमा बाबत अद्यावत राहण्याची, प्रवेशपत्र डाउनलोड करून घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

3. लेखी परिक्षेअंती मुलाखतीसाठी पात्र अर्जदारांचे जाहीरातीनुसार आवश्यक पात्रता व अर्जात भरलेली माहिती यांच्या आधारे मुळ कागदपत्रे पडताळणी करण्याकरीता अंतरीम स्वरुपात यादी जाहीर करण्यात येईल. ज्या अर्जदाराची जाहीरातीनुसार आवश्यक पात्रता व अर्जात भरलेली माहिती, परिक्षा शुल्क कागदपत्रांच्या आधारे परिपूर्ण सिध्द होईल अशाच अर्जदाराचा विचार भरती प्रक्रियेच्या पुढील टप्पाकरीता करण्यात येईल. जाहिरातीत नमुद केलेली संपूर्ण अर्हता अर्जात भरलेली माहिती व मुळ कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास अर्जदाराची उमेदवारी भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर रद्द होवू शकेल.

4. अर्जदार शारिरीकदृष्ट्या सक्षम असल्याबाबतचे जिल्हा शल्य चिकित्सक बीड यांचे अचवा सक्षम वैद्यकिय अधिका-यांचे प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील व अर्जदाराची पात्रता वैद्यकिय तपासणी अंतीच निश्चित करण्यात येईल.

5. अर्जदाराचे चारित्र्य निष्कलंक असल्याबाबतचे संबंधीत पोलीस स्टेशनचे चारित्र्य प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

6. अर्जदारांचे कोणत्याही राजकिय पक्षाशी संबंध नसावा त्याचप्रमाणे इतर ठिकाणी संपूर्ण वेळ नोकरी करणारा नसावा. त्याचप्रमाणे ग्रामपंचायत सदस्य नसावा. तसेच खाजगी किंवा निमसरकारी संस्थेचा सदस्य नसावा अथवा पुर्णवेळ नोकरी करणारा नसावा याबाबतचे रुपये 100/- च्या स्टॅम्प पेपरवरील प्रतिज्ञापत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

7. पोलीस पाटील पदावरील नियुक्तीकरीता मृत / सेवानिवृत पोलीस पाटलांच्या वारसांनी अर्ज केल्यास त्याला प्राधान्य देण्यात येईल. परंतु याचा अर्थ एकाच स्थानासाठी (Position) पोलीस पाटलांच्या वारसांसह दोन किंवा अधिक अर्जदारांना समान गुण मिळाल्यास पोलीस पाटलांच्या वारसांची निवड करण्यास प्राधान्य देण्यात येईल. परंतु तो महाराष्ट्र ग्रामपोलीस पाटील (सेवा, प्रवेश, पगार भत्ते आणि सेवेच्या इतर शर्ती) आदेश 1968 व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणानुसार आरक्षित गावांसाठी ठरविण्यात आलेल्या वर्गाचा असला पाहिजे.

8. अर्जदार संबंधीत गावचा स्थानिक व कायमचा रहिवासी असणे आवश्यक आहे.

9. अर्जदार कोणत्याही एकाच गावाचा स्थानिक / कायमचा रहिवासी असू शकतो. सबब अर्जदाराने अशाच एका गावात अर्ज करावा. एकापेक्षा अधिक गावातुन केलेले सर्व अर्ज बाद करण्यात येतील.

10. प्रत्येक गावात केवळ एक पद उपलब्ध आहे व ते शासकिय निकषानुसार आरक्षित करण्यात आलेले आहे. अर्ज करतांना अर्जदाराने आरक्षण तपासून अर्ज करावा. (आरक्षणा व्यतिरिक्त असलेल्या उमेदवारांनी अर्ज करु नये)

11. संपूर्ण पाटोदा उपविभागातील रिक्त पदांच्या सर्व गावांसाठी एकाच दिवस व वेळी परीक्षा घेण्यात येईल.

12. संपूर्ण भरती प्रक्रीया गाव निहाय होणार असून कोणत्याही दोन गावाच्या प्रक्रियेचा एकमेकांशी संबंध नसेल.

13. पोलीस पाटील हे पद वर्गीकृत नाही.

14. पोलीस पाटलांना क्षेत्रिय स्तरावर (Field work) काम करावे लागते. त्यामुळे सदर पद धारण करणारी व्यक्ती ही शारीरिक दृष्ट्या सक्षम असणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांना दिव्यांगसाठीचे आरक्षण लागू करण्यात आलेले नाही.

15. पोलीस पाटील हे पद एका गावात एकच असते त्यामुळे हे पद एकाकी असल्याने त्यांना प्रकल्पग्रस्त माजी सैनिक, खेळाडू यासारखी समांतर आरक्षणे लागु होत नाहीत.

16. महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागासवर्ग यांचेसाठी आरक्षण अधिनियम, 2001 (सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र. 8) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक 29 जानेवारी 2004 पासुन अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर) वि.जा.अ., भ.ज.ब., भ.ज.क., भ.ज.ड., वि.मा.प्र. व इ.मा.व., सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग यांना लागू आहे. सदर प्रवर्गातील उमेदवारांकडे दिनांक 31/03/2026 पर्यंत अथवा चालु आर्थीक वर्षातील वैध असलेले नॉन क्रिमीलेअर दिनांक 30.09.2025 किंवा त्यापूर्वी निर्गमित केलेले सक्षम अधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. नॉन क्रिमीलेअरचे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व्यतिरिक्त इतर मागास प्रवर्गाना लागू राहील.

17. महिलांसाठी आरक्षित पदांकरिता दावा करणाऱ्या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधीवासी (Domiciled) असल्याबाबत प्रमानपत्र सादर करावे. तसेच महाराष्ट्र शासन महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्र. महिआ 2023/प्र.क्र.223/कार्या-2 दि. 4 मे 2023 अन्वये खुल्या गटातील महिलांकरिता आरक्षीत असलेल्या पदावरती निवडी करिता नॉन क्रिमिलेअर प्रमापात्राची अट रद्द करणेत आलेली आहे. तसेच अनिसुचीत जाती व जमाती वगळता अन्य मागासप्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करू इच्छिणाऱ्या महिलांना त्या त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागासवर्ग व बहुजन कल्याणविभाग तसेच सामान्य प्रशासनाकडून वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

18. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन अधिसूचना क्र. एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/12, दिनांक 28/03/2005 व क्र. एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000 दिनांक 01/07/2005 तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 अन्वये दिनांक 28/03/2005 रोजी हयात असलेले व त्यानंतर जन्माला आलेल्या

अपत्यांच्या संख्येबाबत लहान कुटुंब असल्याचे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्रक सादर करणे आवश्यक आहे. तसेच अविवाहीत असणा-या उमेदवारांनेही विहीत (अ) नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

19. लेखी परिक्षेत पात्र ठरलेल्या अर्जदारास पोलीस पाटील भरती निवडीसाठी घेण्यात येणा-या 20 गुणांच्या तोंडी (मुलाखत) परिक्षेस अनुपस्थित राहणारा अर्जदार अंतीम निवडीस अपात्र ठरेल. उमेदवाराला मुलाखतीत शुन्य गुण मिळाले असले तरी लेखी परिक्षेतील गुणांच्या आधारे तो जर गुणवत्ता यादीत येत असेल तर असा अर्जदार पोलीस पाटील पदावरील निवडीकरीता पात्र राहील.

20. समान गुण मिळाल्यास अंतिम निवड शासन निर्णय क्र डीव्हीपी-1113/1767/प्र.क्र. 592/ पोल-8, दिनांक 22/08/2014 अन्वये गुणवत्ता यादीतील एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा अधिक अर्जदाराला समान गुण मिळाल्यास प्राधान्य क्रमाच्या आधारे उमेदवारांची अंतीम निवड केली जाईल.

1. पोलीस पाटलांचे वारस, त्यानंतर
2. अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणारे अर्जदार त्यानंतर
3. माजी सैनिक असलेले अर्जदार, त्यानंतर
4. वयाने जेष्ठ असलेले अर्जदार

(पोलीस पाटलांच्या वारसामध्ये पती, पत्नी आणि दोन मुले यांचा समावेश त्या व्यतिरीक्त अन्य कोणत्याही नातेवाईकांचा वारस म्हणून विचार करता येणार नाही.)

21. याशिवाय महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियम 1967 व त्यास संलग्न असलेले नियम आणि वेळोवेळी शासनाने निर्गमित केलेले आदेश, शासन निर्णय, परिपत्रकांतील नेमणूकीसाठी इतर प्रचलित असलेल्या अटी सुध्दा बंधनकारक असतील.

22. हा जाहीरनामा / जाहिरात प्रसिध्द होण्यापूर्वी ज्या उमेदवारांनी पोलीस पाटील पदांसाठी कोणत्याही प्रकाराचे अर्ज केले असतील ते सर्व अर्ज रद्द झाले आहे. असे समजण्यात येईल.

23. परीक्षा शुल्क भरणा न करण्यात आलेले अर्ज अपात्र करण्यात येतील.

**इ) ऑनलाईन (Online) अर्ज करण्याची पध्दत :-**

1) प्रस्तुत पदांकरीता फक्त https://beedpp.recruitonline.in या अधिकृत संकेतस्थळावरून विहित पध्दतीने भरलेले ऑनलाईन पध्दतीने केलेले अर्ज स्वीकारण्यात येतील.

2) इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक चुकीचा / अपूर्ण तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रिये दरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणा-या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. तसेच ई-मेल आयडी व मोबाईल संदेश बहनात येणा-या तांत्रिक अडचणींना उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, बीड हे जबाबदार असणार नाही. सदर संकेत स्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

3) पात्र उमेदवाराला वेब बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज https://beedpp.recruitonline.in या वेबसाईटद्वारे दि, 19.01.2026 ते दि.30 01.2026 या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील. अंतिम दिनांकानंतर संकेतस्थळावरील अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.

4) अर्जदार सदर संकेतस्थळावर प्रथम लॉगीन आयडी शतर्ती या चौ खात्री करुन अर्ज भरावा, अर्ज नाकारल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत अर्जदार यांचौ राहील. पासवर्ड तयार करुन जतन करुन ठेवावा. अर्जदार यांनी अर्ज भरता नागावाचे नाव, आरक्षण व जाहिराती मधील अटी व शर्ती याची खात्री करून अर्ज भरावा. अर्ज नाकारल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत अर्जदार यांची राहील.

5) अर्जदारांनी सदर संकेतस्थळावर विस्तृत माहितीसाठी प्रथम अर्नकसा भरावा हार्टव ओपन करुन पहावा.
6) https://beedpp.recruitonline.in या संकेतस्थळावर अर्ज करा या link वर clik करावे. या नंतर संबधीत पदासाठीचा अर्ज दिसून येईल.

7) उमेदवाराने त्याचा मागील सहा महिन्याची कालावधी मधील Photo व सही संकेतस्थवर दिलेल्या माहितीनुसार upload करावा.

8) उमेदवाराने सर्व माहिती भरल्यानंतर continue बर click करावे या मुळे भरलेल्या अर्जाचे पुनर्वलोकन (Review) करता येईल. तसेच अर्जातील माहिती बदलायची असल्यास edit form वर click करुन करता येईल.

9) अर्जातील सर्व माहिती बरोबर असल्याची खात्री करुन save and continue करावे. त्यांनंतर अर्ज save होऊन Form Id तयार होईल. तयार झालेला Form Id संपुर्ण भरती प्रक्रीयेत उपयुक्त असल्याने सांभाळुन ठेवावा.

10) यानंतर उमेदवाराने परिक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने UPI-Phonepay, Gpay ईत्पादवारे QR Code स्कॅनकरुन ऑनलाईन पद्धतीने भरणे अवश्यकराहील.

11) ऑनलाईल परीक्षा शुल्क भरल्यानंतर अर्जाची print काढता येईल.

12) उमेदवाराने संकेतस्थळावर नोंदणी करताना दिलेल्या मोचाईलनंबरवर भरतीप्रक्रीयासंदर्भात आवश्यक त्या सुचना एसएमएसव्दारे दिल्या जातील.

13) उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (online) पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना, अर्जदारयांचेकडे असलेली उच्चशैक्षणिक गुणवत्ता व ईतरशैक्षणीक अर्हता कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक आहे. तथापि, ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांच्या पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहील्यास व भरतीच्या कोठल्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास पाची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहोल व याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही. जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अटी शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण वगैरेची पात्रता तपासून ऑनलाईन अर्ज भरावा,

14) अर्जदारांनी प्रवेशपत्र दि.02/02/2026 रोजीपासून Download करुन घ्यावेत. व परिक्षादिवशी सदरील प्रवेशपत्राची कलर प्रत सादर करणे बंधनकारक राहील. प्रवेशपत्राशिवाय परिक्षेकरीता प्रवेश दिला जाणार नाही. तसेच सोबत आधारकार्डची प्रत आणने देखील बंधनकारक राहील. तसेच महिलांचे लग्नानंतर नावात बदलझाला असल्यास नमुना-फ मधील स्वयंघाषनापत्र सादर करणे आवश्यक राहील. (नमुना-फ नमुना जाहीराती सोबत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे)

15) कोणत्य कोणत्याही उमेदवारास पोस्टादवारे प्रवेशपत्र पाठवले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

16) लेखी परिक्षाझाल्यावर त्याच दिवशी प्रथम उत्तरतालीका संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल व लेखीपरिक्षेच्या दुस-या दिवशी सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत लेखी पुराव्यानिशी आक्षेप समक्ष उपस्थीत राहून उपविभागीय अधिकारी कार्यालय, पाटोदा येथे दाखल करावा.

17) उमेदवाराची लेखी परीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहित पात्रतेनुसार कोणतेही कागदपत्रे पूर्वतपासणी / छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबत कोणताही हक्क राहणार नाही. कागदपत्राच्या पूर्ण छाननीनंतर उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल, लेखापरिक्षेच्या प्राथमिक चाळणी/तोंडीपरीक्षेनुसार गुणवत्तेच्या आधारे उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहित पात्रतेनुसार अंतरीम यादी प्रसिध्द करुन उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल.

सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणा-या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार उपविभागीय दंडाधिकारी बीड यांचे जवळ राखून ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

18) ज्या उमेदवारांनी यापूर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालय/समाजकल्याण विभाग, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयात नोंदविलेली आहेत, अशा उमेदवारांना विहित मुदतीत स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज करणे व परीक्षाशुल्क भरणे आवश्यक राहील. अशा उमेदवारांनी अन्य कोणत्याही मार्गाने सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, अशा उमेदवाराना या कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही.

19) माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक बोर्डात नावनोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. सदरप्रमाणपत्र, कागदपत्रे पडताळणीच्यावेळी सादर करावे लागतील.

20) ऑनलाईन अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस/कागदपत्र पडताळणीस बोलविण्याचा अयवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहीत अर्हताधारण न करणारा आढळल्यास खोटी माहिती पुरविल्यास किंवा एखादया अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष अप्रत्यक्ष दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतूनबाद करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्तकरण्यात येईल व त्याच्याविरुध्दकायदेशीर कारवाई करण्यात येईल.

21) निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात दिलेली माहिती अगर कागदपत्रेखोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी/ नियुक्ती रद्द करण्यात येईल व शासनाची दिशाभूल केल्यामुळे त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

22) अपात्र अर्जदारास स्वतंत्ररित्या कळविण्यात येणार नाही.

23) परीक्षेस पडताळणीस मुलाखतीस बोलाविलेल्या अर्जदारांना स्वखर्चाने उपस्थित राहावे.

24) अर्जदाराने भरती प्रक्रीये दरम्यान राजकीय दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास अशा उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल.

25) या पुढील सर्व माहीती जसे, पात्र/अपात्र उमेदवारांच्या यादया, प्रवेशपत्र, (Answer Key), उमेदवारास प्राप्त गुण यादी, मुलाखतीस पात्र उमेदवाराची यादी, अंतिम निवड यादी उत्तरसुची https://beedpp.recruitonline.in या संकेतस्थळावरील पोलीस पाटीलभरती प्रक्रीया 2026" याशिर्षका खाली उपलब्ध राहील.

26) सदरील भरती प्रक्रीयेबाबतीत सूचना, हरकत असल्यास, मो.क्र. 9970665115 यावर सकाळी 10.00 ते सायंकाळी 06.00 या वेळेत संपर्क करावा.

27) वरील अटी, शर्ती नियमांव्यतिरिक्त शासनाने वेळोवेळी पदभरतीचे अनुषंगाने निर्गमीत केलेल्या सूचना, आदेश व निर्णय लागू राहतील.

दिनांक:- 16/01/2026.
ठिकाण:- पाटोदा

उपविभागीय दंडाधिकारी पाटोदा

सत्यमेव जयते

SHAIKH VASIMA HYDARSAB

Digitally signed by SHAIKH VASIMA HYDARSAB
Date: 2026.01.17 13:43:44 +05'30'

**(वसिमा शेख)**
उपविभागीय दंडाधिकारी तथा अध्यक्ष
पोलीस पाटील निवड समिती पाटोदा

**प्रतिलीपीः**

1. मा. जिल्हादंडाधिकारी बीड यांना माहितीस्तव सविनय सादर
2. जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी, बीड (एन. आय. सी.) यांना कळविण्यात येते की, सदर जाहिरात https://beed.gov.in व https://beedpp.recruitonline.in या संकेतस्थळावर दिनांक /01/2026 रोजी प्रसिध्द करावी.
3. उपविभागीय पोलीस अधिकारी, आष्टी यांना कळविण्यात येते की, सदर जाहिरात आपले कार्यालयाचे सूचना फलकावर दर्शनी भागात प्रसिध्द करावी.
4. तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार पाटोदा / आष्टी यांनी सदर जाहिरातीचे जाहीर प्रगटन आपले कार्यालयाचे सुचना फलकावर व संबंधीत गावाच्या चावडीवर / गावाच्या मुख्य ठिकाणी ग्राम महसूल अधिकारी यांचेमार्फत प्रसिध्द करुन पंचनामा अहवाल या कार्यालयास दाखल करण्याची दक्षता घ्यावी.
5. गटविकास अधिकारी, पं.स. पाटोदा / आष्टी यांनी सदर जाहिरातीचे जाहीर प्रगटन आपले कार्यालयाचे सुचना फलकावर व संबंधीत गावाच्या ग्रामपंचायत अधिकारी यांचेमार्फत ग्रामपंचायत कार्यालयाच्या सुचना फलकावर प्रसिध्द करुन पंचनामा अहवाल 03 दिवसात या कार्यालयास दाखल करण्याची दक्षता घ्यावी
6. पोलीस निरिक्षक पाटोदा/आष्टी/अमळनेर/अंभोरा, जि.बीड यांनी सदर जाहिरातीचे जाहीर प्रगटन आपले कार्यालयाचे सुचना फलकावर डकवून प्रसिध्दी देण्यात यावी.

SHAIKH VASIMA HYDARSAB
Digitally signed by SHAIKH VASIMA HYDARSAB
Date: 2026.01.17 13:42:50 +05'30'

(वसीमा शेख)

उपविभागीय दंडाधिकारी तथा अध्यक्ष
पोलीस पाटील निवड समिती पाटोदा

उपविभागीय दंडाधिकारी पाटोदा

## १. अनुसूचित जाती:-

| अ.क्र. | तालुका | अनु.जाती प्रवर्गासाठी राखीव झालेली गावे | स्तंभ ३ मधून ३०% महिलांसाठी राखीव गावे | अनु.जा. सर्वसाधारण |
|---|---|---|---|---|
| 1 | २ | ३ | ४ | ५ |
| 1 | आष्टी | पिंपळसुटी | | |
| 2 | आष्टी | देविगव्हाण | | |
| 3 | आष्टी | दैठणा | | |
| 4 | आष्टी | भाळवणी | | |
| 5 | आष्टी | देसुर | | |
| 6 | पाटोदा | जवळाला | | |
| 7 | आष्टी | हनुमंतगाव | महिला राखीव | |
| 8 | पाटोदा | पारगाव घुमरा | | |
| 9 | पाटोदा | वहाली | महिला राखीव | |
| 10 | आष्टी | सांगवी आष्टी | महिला राखीव | |
| 11 | पाटोदा | सुप्पा | महिला राखीव | |
| 12 | आष्टी | टाकळसिंग | महिला राखीव | |
| 13 | पाटोदा | मुगगाव | | |
| 14 | आष्टी | पिंपळा | | |
| 15 | पाटोदा | पिंपळगावधस | | |
| 16 | पाटोदा | तळेपिंपळगाव | | |
| 17 | आष्टी | केळ | | |
| 18 | आष्टी | खडकत | महिला राखीव | |
| 19 | आष्टी | वेलतुरी | महिला राखीव | |
| 20 | पाटोदा | धनगर जवळका | | |
| 21 | आष्टी | चिखली | | |
| 22 | पाटोदा | कोतन | महिला राखीव | |
| 23 | आष्टी | कऱ्हेवडगांव | | |
| 24 | आष्टी | वाकी | | |
| 25 | पाटोदा | कुटेवाडी | | |
| 26 | पाटोदा | अंतापुर | | |
| 27 | आष्टी | कानडी खु. | | |
| 28 | आष्टी | मंगरूळ | | |
| 29 | आष्टी | साबलखेड | महिला राखीव | |

## २. अनुसूचित जमाती:

| अ.क्र. | तालुका | अनु. जमाती प्रवर्गासाठी राखीव झालेली गावे | स्तंभ ३ मधून महिलांसाठी ३०% राखीव गावे | अनु.ज. सर्वसाधारण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | आष्टी | काकडवाडी | महिला राखीव | |
| २. | आष्टी | मराठवाडी | महिला राखीव | |
| ३. | आष्टी | शेडाळा | महिला राखीव | |
| ४. | आष्टी | लोंखडवाडी | | |
| ५. | पाटोदा | भूसनरवाडी | | |
| ६. | आष्टी | औरंगपूर | महिला राखीव | |
| ७. | आष्टी | बाळेवाडी | | |
| ८. | आष्टी | अरणविहिरा (लमाणतांडा) | | |
| ९. | आष्टी | धीर्डी | | |
| १०. | आष्टी | शेलारवाडी | | |
| ११. | आष्टी | मांडवा | | |
| १२. | आष्टी | दादेगाव | | |
| १३. | आष्टी | अरणविहिरा | महिला राखीव | |
| १४. | आष्टी | ब्रम्हगाव | | |
| १५. | पाटोदा | घोपटवाडी | | |
| १६. | आष्टी | लमाणतांडा (गहुखेल) | | |
| १७. | आष्टी | शेरी खु | | |
| १८. | आष्टी | तागडखेल | महिला राखीव | |
| १९. | आष्टी | खकाळवाडी | | |

## ३. विशेष मागासवर्ग:

| अ.क्र. | तालुका | विशेष मागासवर्ग प्रवर्गासाठी राखीव झालेली गावे | स्तंभ ३ मधून. ३०% महिलांसाठी राखीव गावे | वि. मा.व. सर्वसाधारण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | आष्टी | मुर्शदपुर | | |
| २. | आष्टी | कुंबेफळ | | |
| ३. | आष्टी | निमगाव चोभा | | |
| ४. | आष्टी | आष्टा ह.ना. | महिला राखीव | |
| ५. | आष्टी | घाटापिंपरी | महिला राखीव | |

४. विमुक्त जाती (अ):

| अ.क्र. | तालुका | विमुक्त जाती (अ) प्रवर्गासाठी राखीव झालेली गावे | स्तंभ ३ मधून. ३०% महिलांसाठी राखीव गावे | वि.जाती (अ) सर्वसाधारण गावे |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | आष्टी | लमाणतांडा (वा) | | |
| २. | आष्टी | लमाणतांडा (कारखेल) | | |
| ३. | आष्टी | बीडसांगवी | | |
| ४. | आष्टी | मातकुळी | महिला राखीव | |
| ५. | आष्टी | ढोबळसांगवी | | |
| ६. | आष्टी | कुंभारवाडी | | |
| ७. | आष्टी | शिरापुर | | |
| ८. | आष्टी | वाघळुज | महिला राखीव | |

५. भटक्या जमाती (ब) :

| अ.क्र | तालुका | भटक्या जमाती (ब) प्रवर्गासाठी राखीव झालेली गावे | स्तंभ ३ मधून. ३०% महिलांसाठी राखीव गावे | भटक्या जमाती (ब) सर्वसाधारण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | पाटोदा | तिरमलवाडी | | |
| २. | आष्टी | कासारी | | |
| ३. | पाटोदा | जोगदंडवाडी | महिला राखीव | |
| ४. | आष्टी | बिरगंळवाडी | | |
| ५. | आष्टी | जळगांव | | |
| ६. | आष्टी | पुंडी | | |
| ७. | आष्टी | करंजी | महिला राखीव | |

६.भटक्या जमाती (क) :

| अ.क्र. | तालुका | भटक्या जमाती (क) प्रवर्गासाठी राखीव झालेली गावे | स्तंभ ३ मधून. ३०% महिलांसाठी राखीव गावे | भटक्या जमाती (क) सर्वसाधारण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | पाटोदा | भुरेवाडी | | |
| २. | आष्टी | शेंडगेवाडी | | |
| ३. | आष्टी | भोजेवाडी | | |
| ४. | आष्टी | धनगरवाडी (पि.) | | |
| ५. | आष्टी | हाकेवाडी | महिला राखीव | |
| ६. | आष्टी | कोकरेवाडी | | |
| ७. | पाटोदा | माळपाची वाडी | महिला राखीव | |
| ८. | आष्टी | महादेववाडी | | |
| ९. | आष्टी | निमगाव बोडखा | महिला राखीव | |

**७ भटक्या जमाती (ड) :**

सदर प्रवर्गासाठी एकूण ३ पदे भरावयाची असून लोकसंख्येच्या टक्केवारीनुसार उतरत्या क्रमाने खाल

| अ.क्र. | तालुका | भटक्या जमाती (ड) प्रवर्गासाठी राखीव झालेली गावे | स्तंभ ३ मधून. ३०% महिलांसाठी राखीव गावे | भटक्या जमाती (ड) सर्वसाधारण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | पाटोदा | खाडेवस्ती | महिला राखीव | |
| २. | पाटोदा | हनुमानवाडी | | |
| ३. | पाटोदा | डागाचीवाडी | | |

**८ इतर मागास वर्ग :**

| अ.क्र. | तालुका | इतर मागास वर्ग प्रवर्गासाठी राखीव झालेली गावे | स्तंभ ३ मधून. ३०% महिलांसाठी राखीव गावे | इतर मागास वर्ग सर्वसाधारण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | आष्टी | चिंचोली | | |
| २. | आष्टी | सोलेवाडी | महिला राखीव | |
| ३. | आष्टी | बळेवाडी पा. | | |
| ४. | आष्टी | आनंदवाडी | | |
| ५. | आष्टी | नांदूर | | |
| ६. | आष्टी | डोंगरगण | | |
| ७. | आष्टी | केरुळ | | |
| ८. | आष्टी | कोल्हेवाडी | | |
| ९. | आष्टी | लोणी स. | | |
| १०. | पाटोदा | सोनेगाव | | |
| ११. | आष्टी | पारगाव जो. | महिला राखीव | |
| १२. | आष्टी | सुलेमान देवळा | | |
| १३. | आष्टी | किन्ही | | |
| १४. | आष्टी | उंदरखेल | | |
| १५. | पाटोदा | नायगाव | | |
| १६. | आष्टी | कोयाळ | | |
| १७. | आष्टी | सराटे वडगाव | | |
| १८. | आष्टी | रुईनालकोल | | |
| १९. | आष्टी | धानोरा | महिला राखीव | |
| २०. | आष्टी | जामगाव | | |
| २१. | आष्टी | टाकळी अमिया | महिला राखीव | |
| २२. | पाटोदा | गवळवाडी | | |
| २३. | पाटोदा | उखंडा | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २४. | आष्टी | गहुखेल | महिला राखीव | |
| २५. | पाटोदा | अनपटवाडी | महिला राखीव | |
| २६. | आष्टी | देवळाली | महिला राखीव | |
| २७. | आष्टी | हिंगणी | महिला राखीव | |
| २८. | पाटोदा | साकुंडवाडी | | |
| २९. | पाटोदा | पिठठी | | |
| ३०. | आष्टी | देविनिमगाव | | |
| ३१. | आष्टी | वनवेवाडी मो. | महिला राखीव | |
| ३२. | आष्टी | साकत | | |
| ३३. | आष्टी | सावरगाव | महिला राखीव | |
| ३४. | पाटोदा | दौलतवाडी | | |
| ३५. | आष्टी | बांदखेल | | |
| ३६. | पाटोदा | रामवाडी | | |
| ३७. | आष्टी | भातोडी | महिला राखीव | |
| ३८. | पाटोदा | बेडुकवाडी | | |
| ३९. | आष्टी | हातोळण | | |
| ४०. | पाटोदा | निरगुडी | | |
| ४१. | आष्टी | मोरेवाडी | महिला राखीव | |
| ४२. | आष्टी | कारखेल बु. | | |
| ४३. | आष्टी | पिंपरीघाटा | | |
| ४४. | आष्टी | वेताळवाडी | | |
| ४५. | पाटोदा | घाटेवाडी | | |
| ४६. | आष्टी | शेकापुर | | |
| ४७. | आष्टी | सांगवी पा. | महिला राखीव | |
| ४८. | आष्टी | दौलावडगाव | | |
| ४९. | पाटोदा | दासखेड | महिला राखीव | |
| ५०. | पाटोदा | वैघकिन्ही | | |
| ५१. | आष्टी | पिंपरखेड | महिला राखीव | |

## ९ एसईबीसी घटक

| अ.क्र. | तालुका | **एसईबीसी** प्रवर्गासाठी राखीव झालेली गावे | स्तंभ ३ मधून. ३०% महिलांसाठी राखीव गावे | इतर मागास वर्ग सर्वसाधारण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | पाटोदा | आंबेवाडी | | |
| २. | पाटोदा | जरेवाडी | | |
| ३. | पाटोदा | मळेकरवाडी | महिला राखीव | |
| ४. | पाटोदा | जन्याचीवाडी | | |
| ५. | पाटोदा | मेंगडेवाडी | महिला राखीव | |
| ६ | पाटोदा | मांडवेवाडी | | |
| ७ | आष्टी | खकाळवाडी | | |
| ८ | आष्टी | राघापुर | | |
| ९ | पाटोदा | चंद्रेवाडी | | |
| १० | आष्टी | बोरुडवाडी | | |
| ११ | पाटोदा | सरदवाडी | महिला राखीव | |
| १२ | आष्टी | सुंबेवाडी | महिला राखीव | |
| १३ | आष्टी | गांधनवाडी | | |
| १४ | पाटोदा | साबळेवाडी | | |
| १५ | आष्टी | भवरवाडी | महिला राखीव | |
| १६ | पाटोदा | बोडखेवाडी | महिला राखीव | |
| १७ | आष्टी | शिंदेवाडी | | |
| १८ | आष्टी | चिंचाळा | | |
| १९ | पाटोदा | जाधववाडी | | |
| २० | आष्टी | नांदा | महिला राखीव | |
| २१ | आष्टी | तवलवाडी | | |
| २२ | पाटोदा | बेदरवाडी कु. | | |
| २३ | आष्टी | गणगेवाडी | | |
| २४ | पाटोदा | गंडाळवाडी | | |
| २५. | पाटोदा | राऊतवाडी | महिला राखीव | |

उपविभागीय दंडाधिकारी
सत्यमेव जयते
पाटोदा

१०.आंथिक  दृष्टया दुबेल घटक :

| अ.क्र. | तालुका | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक प्रवर्गासाठी राखीव झालेली गावे | स्तंभ ३ मधून. ३०% महिलांसाठी राखीव गावे | अ.दृ.दु. घटक सर्वसाधारण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | आष्टी | पाटण | | |
| २. | आष्टी | महाजनवाडी | महिला राखीव | |
| ३. | पाटोदा | थेरला | महिला राखीव | |
| ४. | आष्टी | पाटसरा | | |
| ५. | पाटोदा | उंबरविहिरा | महिला राखीव | |
| ६. | पाटोदा | सावरगाव सो. | | |
| ७. | आष्टी | लाटेवाडी | | |
| ८. | पाटोदा | भायाळा | | |
| ९. | आष्टी | खडकवाडी | महिला राखीव | |
| १०. | पाटोदा | सावरगाव घाट | महिला राखीव | |
| ११. | पाटोदा | पांढरवाडी | महिला राखीव | |
| १२. | आष्टी | गंगादेवी | | |
| १३. | आष्टी | खिळद | | |
| १४. | पाटोदा | काकडहिरा | महिला राखीव | |
| १५. | आष्टी | शिराळ | | |
| १६. | पाटोदा | पिंपळवंडी | | |
| १७. | पाटोदा | नफरवाडी | | |
| १८. | आष्टी | पांगुळगव्हाण | | |
| १९. | पाटोदा | येवलवाडी ना. | | |
| २०. | आष्टी | सुरडी | | |
| २१. | पाटोदा | पारनेर | | |
| २२. | आष्टी | महिंदा | | |
| २३. | आष्टी | कापसी | महिला राखीव | |
| २४. | पाटोदा | वानेवाडी | | |
| २५. | पाटोदा | वाघीरा | | |



## ११. अराखीव :

| अ.क्र. | तालुका | अराखीव प्रवर्गासाठी राखीव झालेली गावे | स्तंभ ३ मधून. ३०% महिलांसाठी राखीव गावे | अराखीव सर्वसाधारण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | आष्टी | दरेवाडी | महिला राखीव | |
| २. | पाटोदा | वडझरी | महिला राखीव | |
| ३. | पाटोदा | महिंद्रवाडी | महिला राखीव | |
| ४. | आष्टी | पिंपळगाव दाणी | महिला राखीव | |
| ५. | पाटोदा | निवंडुगा | महिला राखीव | |
| ६. | आष्टी | पोखरी | महिला राखीव | |
| ७. | आष्टी | वाळुज | महिला राखीव | |
| ८. | आष्टी | खुंटेफळ पुंडी | महिला राखीव | |
| ९. | पाटोदा | करंजवन | महिला राखीव | |
| १०. | आष्टी | बावी | महिला राखीव | |
| ११. | पाटोदा | भक्ताचेकोठे | महिला राखीव | |
| १२. | आष्टी | रुटी | महिला राखीव | |
| १३. | पाटोदा | पांचग्री | महिला राखीव | |
| १४. | आष्टी | वंजारवाडी | महिला राखीव | |
| १५. | आष्टी | पिंपरी घु. | महिला राखीव | |
| १६. | आष्टी | बोरुडी | महिला राखीव | |
| १७. | आष्टी | मातावळी | महिला राखीव | |
| १८. | आष्टी | कानडी बु. | महिला राखीव | |
| १९. | आष्टी | धनगरवाडी डो. | महिला राखीव | |
| २०. | पाटोदा | मंजरीघाट | | |
| २१. | आष्टी | पिंपरी आष्टी | | |
| २२. | आष्टी | खरकटवाडी | | |
| २३. | पाटोदा | कुसंळब | | |
| २४. | पाटोदा | नागेशवाडी | | |
| २५. | आष्टी | नागतळा | | |
| २६. | पाटोदा | बेनसुर | | |
| २७. | पाटोदा | सगळेवाडी | | |
| २८. | आष्टी | राळसांगवी | | |
| २९. | पाटोदा | चुंबळी | | |
| ३०. | आष्टी | कारखेल खु. | | |
| ३१. | आष्टी | केळसांगवी | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३२. | पाटोदा | सौंदाणा | | |
| ३३. | पाटोदा | मिसाळवाडी | | |
| ३४. | पाटोदा | रोहतवाडी | | |
| ३५. | पाटोदा | डोंगरकिन्ही | | |
| ३६. | आष्टी | फत्तेवडगाव | | |
| ३७. | पाटोदा | वैजाळा | | |
| ३८. | आष्टी | लिंबोडी | | |
| ३९. | आष्टी | पांढरी | | |
| ४०. | आष्टी | हाजीपुर | | |
| ४१. | आष्टी | सोलापूरवाडी | | |
| ४२. | पाटोदा | पाचेगाव | | |
| ४३. | पाटोदा | कवडवाडी | | |
| ४४. | पाटोदा | महासांगवी | | |
| ४५. | पाटोदा | ढाळेवाडी | | |
| ४६. | आष्टी | खलाटवाडी | | |
| ४७. | आष्टी | धामणगाव | | |
| ४८. | आष्टी | हातोला | | |
| ४९. | आष्टी | वटणवाडी | | |
| ५०. | पाटोदा | येवलवाडी स. | | |
| ५१. | आष्टी | वाहिरा | | |
| ५२. | पाटोदा | गांधनवाडी आ. | | |
| ५३. | आष्टी | पारोडी | | |
| ५४. | आष्टी | वनवेवाडी | | |
| ५५. | पाटोदा | तांबाराजुरी | | |
| ५६. | पाटोदा | चिंचोली | | |
| ५७. | पाटोदा | सौताडा | | |
| ५८. | आष्टी | कासेवाडी | | |
| ५९. | आष्टी | हिवरा | | |
| ६०. | पाटोदा | डोमरी | | |
| ६१. | पाटोदा | गायकवाडी | | |
| ६२. | पाटोदा | खडकवाडी | | |
| ६३. | आष्टी | आंबेवाडी | | |
| ६४. | पाटोदा | तगारवाडी | | |
| ६५. | पाटोदा | वाघाचवाडा | | |

SHAIKH VASIMA HYDARSAB
Digitally signed by SHAIKH VASIMA HYDARSAB
Date: 2026.01.17 13:46:09 +05'30'

उपविभागीय दंडाधिकारी
पाटोदा

## नमुना-फ
## स्वयंघोषणापत्र

मी,श्रीमती(लग्नानंतरचेनाव)------------------------------------------------------- राहणार

(गावाचे नाव)--------------------------ता.-----------------------जि .बीड येथील रहिवासी आहे.याव्दारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करते की,

1. मी पोलीस पाटील पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.
2. माझे लग्नापूर्वीचे नाव श्रीमती-----------------------------------------------असे आहे व

   लग्नानंतरचे नाव श्रीमती-------------------------------------------असे आहे.
3. पोलीस पाटील पदाच्या फॉर्मचा आयडी क्रमांक-------------------------------------
4. आधार क्रमांक------------------------------------------------------------------

वरील दोन्ही नावाची व्यक्ती मीच असून यात काही तफावत आढळल्यास त्यास सर्वस्वी जबाबदार मी राहील व यामुळे पोलीस पाटील पदासाठी मी अपात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण-

दिनांक-

संपूर्ण नाव---------------------------------------------------- सही-

सुचना-

1. सर्व विवाहीत महिलांनी पोलीस पाटील पदासाठी लग्नापुर्वी/लग्नानंतरचे नावाने केलेले अर्ज ग्राहय धरण्यात येतील.
2. उमेदवाराने लेखी परिक्षाच्या वेळेस रंगीत प्रवेशपत्र (Color Copy) व आधारकार्ड सोबत सदरचे स्वयंघोषणापत्र सादर करणे आवश्यक राहील.